**जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय,**
**भिवंडी, मु. शेलार, ता. भिवंडी, जि. ठाणे, पिन-** 421302,
**ईमोल-** acahvpcbhiwandi@gmail.com, **मो.** 9226332850


------------------------------------------------------------------------------------------------------------5

**जा.क्र. जिपसचि भिवंडी/** 116 /2025 , **दि.**27/5/2025

**बोलीद्वारे निर्लेखीत केलेल्या वाहनाचा लिलाव करणेसाठी प्रसिध्दी पत्रक**

सहाय्यक आयुक्क पशुसंवर्धन, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, भिवंडी, जि. ठाणे हे जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, भिवंडी, मु. शेलार, ता. भिवंडी, जि. ठाणे येथिल निर्लेखीत केलेल्या वाहनाची (**वाहनाचे वर्णन - महिंद्र एण्ड महिंद्र** 4000 **डी.पी. जीप मॉडेल, चासीस क्रमांक- डी.एच. —** 34726, **वाहन खरेदीची दिनांक — दि.**21/1/1986, **वाहन क्र. MZG-** 9441) बोलीद्वारे लिलाव करून विक्री करणार आहेत. करीता इच्छूक खरेदीदारांना आमंत्रीत करण्यात येत आहे. बोलीद्वारे लिलाव करून विक्री करणेसाठी गठीत लिलाव समिती खालिल प्रमाणे.

| अ.क्र. | पदनांम | शेरा |
|---|---|---|
| 1 | सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, भिवंडी | अध्यक्ष |
| 2 | पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती भिवंडी | सदस्य |
| 3 | पशुधन विकास अधिकारी, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, भिवंडी | सदस्य सचिव |

**जाहिर लिलावाचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| 1 | जाहिर लिलावाची सुचना प्रसिध्दीचा दिनांक | दि27/5/2025 |
| 2 | लिलाव करावयाचचे वाहन बघण्याचा कालावधी | दि.28/5/2025, ( स. 9.30 ते सायं. 4.30) ते दि.3/6/2025, ( स. 9.30 ते सायं. 4.30) |
| 3 | लिलावाचा दिवस व वेळ | दि.4/6/2025,सकाळी 10.30 |
| 4 | लिलावाचे ठिकाण | जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, भिवंडी, मु. शेलार, ता. भिवंडी, जि. ठाणे |
| 5 | लिलाव करावयाच्या वस्तूंची यादी व वस्तू बघण्याचे ठिकाण | जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, भिवंडी, मु. शेलार, ता. भिवंडी, जि. ठाणे |

**लिलावाच्या अटी व शर्ती**

1. उक्त लिलाव समितीद्वारे निर्लेखीत वाहनाची बोलीद्वारे लिलाव करून विक्री करण्यात येईल.
2. इच्छूक खरेदीदारास लिलाव करावयाचे वाहन जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, भिवंडी, मु. शेलार, ता. भिवंडी, जि. ठाणे या ठिकाणी उक्त नमुद कालावधित बघता येतील.
3. बोली लावण्यास इच्छूक लिलावधारकास बोली लावण्यापुर्वी रोख रु.500/- अमानत रक्कम जमा करावी लागेल तसेचलिलावधारकास लिलाव प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत हजर राहावे लागेल.
4. उक्त वर्णन केल्या प्रमाणे लिलाव प्रक्रिया दिलेल्या ठिकाणी, दिलेल्या दिवशी, दिलेल्या वेळी बोली लावून करण्यात येईल. प्रत्येक बोली तीन वेळा पुकारण्यात येईल, सर्वांत जादा बोली लावणा-या लिलावधारकाच्या नावे लिलाव मंजूर करण्यात येईल.
5. खरेदीदारास वाहन संपुर्ण खरेदी करावे लागेल.
6. लिलाव झाल्याचे दिनांकापासून 7 दिवसांचे आत कोणास तक्रार करावयाची असल्यास, त्याने तक्रार अर्जा सोबतरु.30000/- चा धनाकर्ष (मा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, जिल्हा ठाणे यांचे नावे) शुल्क म्हणूनसादर करावा

लागेल. सदर शुल्क तक्रारदाराचे म्हणने खरे असल्याचे आढळून आल्यास परत करण्यात येईल अन्यथा सदरचेशुल्क जप्त करण्यात येईल.

7. लिलावात सहभागी होणारे खरेदीदार हा एकल असावा. मालक / संचालक/ भागीदार /बहुसंख्य भागधारक असलेल्याएकापेक्षा जास्त कंपन्या लिलावात भाग घेऊ शकणार नाहित तसेच लिलाव समिती अगर जिल्हा पशुवैद्यकीयसर्वचिकित्सालय, भिवंडी येथे कार्यरत अधिकारी कर्मचारी यांचेशी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध असणा-या व्यक्तीस /संस्थेस लिलावात सहभागी होता येणार नाही.

8. कोणतीही सशर्त बोली विचारात घेतली जाणार नाही.

9. राज्य शासन, केंद्र शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेशी संबंधित खरेदीदार लिलावात भाग घेऊ शकणार नाही.

10. विक्री केलेल्या मालावर लागू असलेले शासकीय कर, स्थानिक संस्था कर, विक्रीकर, आयकर इ. खरेदीदारास स्वत:भरावे लागतील.

11. लिलाव समिती अंतिम निर्णय घेईल व तो निर्णय सर्वांना बंधनकारक राहील.

12. कोणतेही कारण न देता लिलाव स्विकारणे अथवा नाकारणे वा रद्द करण्याचे अधिकार लिलाव समितीने राखून ठेवलेले आहे.

13. जास्तीत जास्त दर देणा-या खरेदीदाराने सादर केलेले दर अपेक्षीत किंमती एवढे अगर त्यापेक्षा जादा आल्यास समितीमान्यता देईल.

14. जादा दर देणा-या लिलावधारकास अध्यक्षांमार्फत स्विकृती पत्र देण्यात येईल. लिलावाची रोख रक्कम सहाय्यक आयुक्तपशुसंवर्धन, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय भिवंडी यांचेकडे तात्काळ लिलावाच्या दिवशी रोखीने भरणा करावीलागेल. त्या नंतरच वाहन ताब्यात दिले जाईल.

15. विक्रीस उपलब्ध वाहन **जसे आहे व जेथे आहे तेथे** या तत्वावर सरसकट तात्काळ लिलावाच्या दिवशी उचलकरावे लागेल. वाहनाची उचल, वाहतूक व हमाली इ. करीता संपुर्ण खर्च खरेदीदाराने करावयाचा आहे.

16. लिलावात सहभागी होणा-या व्यक्तीने त्याचे मुळ आधार ओळखपत्र व त्याची छायाप्रत सोबत आणावी.

(डॉ. अजित सदानंद हिरवे)
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन
जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय
भिवंडी, मु. शेलार, ता. भिवंडी, जि. ठाणे